श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता चतुर्दशोऽध्यायः



पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**
**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

### श्रीमद्भगवद्गीतायां(न्)
### चतुर्दशोऽध्यायः

**श्रीभगवानुवाच**

**परं(म्) भूयः(फ्) प्रवक्ष्यामि, ज्ञानानां(ञ्) ज्ञानमुत्तमम् ।**
**यज्ज्ञात्वा मुनयः(स्) सर्वे, परां(म्) सिद्धिमितो गताः ॥ 1 ॥**

**श्री भगवान म्हणाले ,ज्ञानातीलही अतिउत्तम ते परमज्ञान मी तुला पुन्हा पुन्हा सांगतो की ,जे जाणल्याने सर्व मुनिजन या संसारातून मुक्त होऊन परमसिद्धी पावले आहेत.**

**इदं(ञ्) ज्ञानमुपाश्रित्य, मम साधर्म्यमागताः ।**
**सर्गेऽपि नोपजायन्ते, प्रलये न व्यथन्ति च ॥ 2 ॥**

**हे ज्ञान धारण करून माझ्या स्वरूपाला प्राप्त झालेले पुरुष सृष्टीच्या आरंभी पुन्हा जन्माला येत नाहीत आणि प्रलय काळी ही व्याकुळ होत नाही त.**

मम योनिर्महद्ब्रह्म, तस्मिन्गर्भं(न्) दधाम्यहम् ।

सम्भवः(स्) सर्वभूतानां(न्), ततो भवति भारत ॥ 3 ॥

हे अर्जुना !माझी महद् -ब्रह्मरूप मूळ प्रकृती संपूर्ण भूतांची योनी म्हणजे गर्भधारणा करण्याचे स्थान आहे आणि मी त्या योनीच्या ठिकाणी चेतन -समुदाय रूप गर्भाची स्थापना करतो .त्या जड -चेतनाच्या संयोगाने सर्व भूतांची उत्पत्ती होते.

सर्वयोनिषु कौन्तेय, मूर्तयः(स्) सम्भवन्ति याः ।

तासां(म्) ब्रह्म महद्योनि-रहं(म्) बीजप्रदः(फ्) पिता ॥ 4 ॥

हे अर्जुना !नाना प्रकारच्या सर्व जातींत जितके शरीरधारी प्राणी उत्पन्न होतात ,त्या सर्वांचा गर्भ धारण करणारी माता प्रकृती आहे आणि बीज स्थापन करणारा मी पिता आहे.

सत्त्वं(म्) रजस्तम इति, गुणाः(फ्) प्रकृतिसम्भवाः ।

निबध्नन्ति महाबाहो, देहे देहिनमव्ययम्॥ 5 ॥

हे अर्जुना !सत्वगुण ,रजगड आणि प्रकृती पासून उत्पन्न झालेले तिन्ही गुण अविनाशी जिवात्म्याला शरीरात बांधून ठेवतात.

तत्र सत्त्वं(न्) निर्मलत्वात्- प्रकाशकमनामयम् ।

सुखसङ्गेन बध्नाति, ज्ञानसङ्गेन चानघ ॥ 6 ॥

हे निष्पापा !त्या तीन गुणांमधील सत्वगुण ,निर्मला प्रकाश उत्पन्न करणारा आणि विकार रहित आहे .तो सुखासंबंधीच्या व ज्ञानासंबंधीच्या अभिमानाने बांधतो .

रजो रागात्मकं(वँ) विद्धि, तृष्णासङ्गसमुद्भवम् ।

तन्निबध्नाति कौन्तेय, कर्मसङ्गेन देहिनम् ॥ 7 ॥

हे अर्जुना !राग रूप रजो गुना इच्छा व आसक्ती यांपासून उत्पन्न झालेला आहे ,असे समज .तो या जीवात्म्याला करमांच्या आणि त्यांच्या फळांच्या संबंधाने बांधतो.

तमस्त्वज्ञानजं(वँ) विद्धि, मोहनं(म्) सर्वदेहिनाम् ।

प्रमादालस्यनिद्राभिस्- तन्निबध्नाति भारत ॥ 8 ॥

हे अर्जुना !सर्व देहाभिमानी पुरुषांना मोह पाडणारा तमोगुण अज्ञानापासून उत्पन्न झालेला आहे ,असे समज .तो या जीवात्म्याला प्रमाद ,आळस आणि झोप यांनी बांधतो .

सत्त्वं(म्) सुखे सञ्जयति, रजः(ख्) कर्मणि भारत ।

ज्ञानमावृत्य तु तमः(फ्), प्रमादे सञ्जयत्युत ॥ 9 ॥

हे अर्जुना !सत्वगुण सुखाला ,रजोगुण कर्मांना तसेच तमोगुण ज्ञानाला झाकून प्रमाद करण्याला ही प्रवृत्त करतो .

रजस्तमश्चाभिभूय, सत्त्वं(म्) भवति भारत ।

रजः(स्) सत्त्वं(न्) तमश्चैव, तमः(स्) सत्त्वं(म्) रजस्तथा ॥ 10 ॥

आणि हे अर्जुना !रजो गुणआणि तमोगुण यांना दडपून सत्वगुण वाढतो .सत्वगुण व तमोगुणाला दडपून रजोगुण वाढतो .तसेच सत्वगुण व रजगुणाला दडपून तमोगुण वाढतो .

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्- प्रकाश उपजायते ।

ज्ञानं(यँ) यदा तदा विद्याद्- विवृद्धं(म्) सत्त्वमित्युत ॥ 11 ॥

ज्यावेळी या देहात तसेच अंतःकरणात व इंद्रियांत चैतन्य आणि विवेक शक्ती उत्पन्न होते ,त्यावेळी असे समजावे की ,सत्वगुण वाढला आहे .

लोभः(फ्) प्रवृत्तिरारम्भः(ख्), कर्मणामशमः(स्) स्पृहा ।

रजस्येतानि जायन्ते, विवृद्धे भरतर्षभ ॥ 12 ॥

हे अर्जुना ! रजगुण वाढल्यावर लोभ ,प्रवृत्ती ,स्वार्थाने प्रेरित होऊन फळाच्या इच्छेने कर्मांचा आरंभ ,अशांती आणि विषय भोगांची लालसा ही सर्व उत्पन्न होतात.

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च, प्रमादो मोह एव च ।

तमस्येतानि जायन्ते, विवृद्धे कुरुनन्दन ॥ 13 ॥

हे अर्जुना !तमोगुण वाढल्यावर अंतःकरण व इंद्रिये यांत अंधार 'कर्तव्य कर्मांतप्रवृत्ती नसणे ,व्यर्थ हालचाली आणि झोप इत्यादी अंतःकरणाला मोहित करणाऱ्या वृत्ती ,ही सर्व उत्पन्न होतात .

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु, प्रलयं(यँ) याति देहभृत् ।

तदोत्तमविदां(लँ) लोका- नमलान्प्रतिपद्यते ॥ 14 ॥

जेव्हा हा मनुष्य सत्वगुण वाढलेला असताना मरण पावतो ,तेव्हा तो उत्तम करणे करणाऱ्यांच्या निर्मळ दिव्य स्वर्गाची लोकांत जातो .

रजसि प्रलयं(ङ्) गत्वा, कर्मसङ्गिषु जायते ।

तथा प्रलीनस्तमसि, मूढयोनिषु जायते ॥ 15 ॥

रजो गुणा वाढलेला असता मरण पावल्यास कर्मांची आसक्ती असणाऱ्या मनुष्यांत जन्मतो .तसेच तमोगुण वाढला असता मेलेला माणूस किडा ,पशु इत्यादी मूळ (विवेक शून्य ) जातींत जन्मतो .

कर्मणः(स्) सुकृतस्याहुः(स्), सात्त्विकं(न्) निर्मलं(म्) फलम् ।
रजसस्तु फलं(न्) दुःख- मज्ञानं(न्) तमसः(फ्) फलम् ॥ 16 ॥

श्रेष्ठ (सात्विक )कर्माचे सात्विक अर्थात सुख ,ज्ञान आणि वैराग्य इत्यादी निर्मळ फळ सांगितले आहे .राजसकर्माचे फळ दुःख तसेच तामस कर्मांचे फळ अज्ञान सांगितले आहे .

सत्त्वात्सञ्जायते ज्ञानं(म्), रजसो लोभ एव च ।

प्रमादमोहौ तमसो, भवतोऽज्ञानमेव च ॥ 17 ॥

सत्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते .रजू गुणापासून निः संशय लोह आणि तमोगुणापासून प्रमा द आणि मोह उत्पन्न होतात आणि अज्ञानही होते .

ऊर्ध्वं(ङ्) गच्छन्ति सत्त्वस्था, मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।

जघन्यगुणवृत्तिस्था, अधो गच्छन्ति तामसाः ॥ 18 ॥

सत्वगुणात असलेले पुरुष स्वर्गाची उच्च लोकांना जातात . रजो गुणात असलेले पुरुष मध्यलोकांत म्हणजे मनुष्य लोकातच राहतात आणि तमोगुणाचे कार्य असलेल्या निद्रा ,प्रमाद आणि आळस इत्यादीत रत असलेले तामसी पुरुष अधोगतीला अर्थात कीटक ,पशु इत्यादी नीचयोनीत तसेच नरकात जातात .

नान्यं(ङ्) गुणेभ्यः(ख्) कर्तारं(यँ), यदा द्रष्टानुपश्यति ।

गुणेभ्यश्च परं(वँ) वेत्ति, मद्भावं(म्) सोऽधिगच्छति ॥ 19 ॥

ज्यावेळी द्रष्टा तिन्ही गुणांशिवाय दुसरा कोणीही कर्ता नाही ,असे पाहतो आणि तिन्ही गुणांच्या अत्यंत पलीकडे असणाऱ्या सच्चिदानंद घनस्वरूप मला परमात्म्याला तत्वतः जाणतो ,त्यावेळी तो माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो .

गुणानेतानतीत्य त्रीन्- देही देहसमुद्भवान् ।

जन्ममृत्युजरादुःखैर्- विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ 20 ॥

हापुरुष शरीराच्या उत्पत्तीला कारण असलेल्या या तिन्ही गुणांना उल्लंघून जन्म ,मृत्यू ,वार्धक्य आणि सर्व प्रकारच्या दुःखांपासून मुक्त होऊन परमानंदाला प्राप्त होतो .

अर्जुन उवाच

कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेता- नतीतो भवति प्रभो ।

किमाचारः(ख्) कथं(ञ्) चैतां(म्)स्-त्रीन्गुणानतिवर्तते ॥ 21 ॥

अर्जुन म्हणाला ,या तिन्ही गुणांच्या पलीकडे गेलेला पुरुष कोणकोणत्या लक्षणांनी युक्त असतो ?आणि त्याचे आचरण कशा प्रकारचे असते ?तसेच हे प्रभो !मनुष्य कोणत्या उपायाने या तीन गुणांच्या पलीकडे जातो ?

श्रीभगवानुवाच

प्रकाशं(ञ्) च प्रवृत्तिं(ञ्) च, मोहमेव च पाण्डव ।

न द्वेष्टि सम्प्रवृत्तानि, न निवृत्तानि का ङ्क्षति ॥ 22 ॥

श्री भगवान म्हणाले , हे अर्जुना ! जो पुरुष सत्वगुणाचे कार्यरूप प्रकार ,रजू गुणाचे कार्यरूप प्रवृत्ती आणि तमोगुणाचे कार्यरूप मोह ही प्राप्त झाली असता त्यांचा विषाद मानत नाही आणि प्राप्त झाली नाही तरी त्यांची इच्छा करीत नाही .

उदासीनवदासीनो, गुणैर्यो न विचाल्यते ।

गुणा वर्तन्त इत्येव, योऽवतिष्ठति नेङ्गते ॥ 23 ॥

जो साक्षी रूप राहून गुणांकडून विचलित केला जाऊ शकत नाही आणि गुणच गुणांत वावरत आहेत ,असे समजून जो सच्चिदानंदघन परमात्म्यांत एकरूप होऊन राहतो व त्या स्थिती पासून कधी ढळत नाही .

समदुःखसुखः(स्) स्वस्थः(स्), समलोष्टाश्मकाञ्चनः ।

तुल्यप्रियाप्रियो धीरस्-तुल्यनिन्दात्मसं(म्)स्तुतिः ॥ 24 ॥

जो पुरुष निरंतर आत्मभावात राहून सुख दुःख समान मानतो ,माती ,दगड आणि सोने यांना सारखेच मानतो ,ज्याला आवडती व नावडती गोष्ट सारखीच वाटते जो ज्ञानी आहे आणि स्वतःची निंदा व स्तुती ज्याला समान वाटतात.

मानापमानयोस्तुल्यस्- तुल्यो मित्रारिपक्षयोः ।

सर्वारम्भपरित्यागी, गुणातीतः(स्) स उच्यते ॥ 25 ॥

जो मानव अपमान सारखेच मानतो ,ज्याची मित्र व शत्रू या दोघांविषयी समान वृत्ती असते ,तसेच सर्व कार्यांत ज्याला ' मी करणारा ' हा अभिमान नसतो ,त्याला गुणातीत म्हणतात.

मां(ञ्) च योऽव्यभिचारेण, भक्तियोगेन सेवते ।

स गुणान्समतीत्यैतान्- ब्रह्मभूयाय कल्पते ॥ 26 ॥

आणि जो पुरुष अ व्यभिचारी भक्ती योगाने मला निरंतर भजतो ,तो सुद्धा या तिन्ही गुणांना पूर्णपणे उल्लंघून सच्चिदानंद घन ब्रह्माला प्राप्त होण्यास योग्य ठरतो.

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाह- ममृतस्याव्ययस्य च ।

शाश्वतस्य च धर्मस्य, सुखस्यैकान्तिकस्य च ॥ 27 ॥

कारण त्या अविनाशी परब्रह्माचा ,अमृताचा ,नित्य धर्माचा आणि अखंड एकरस आनंदाचा आश्रय मी आहे

इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि
श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे
गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥14॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥